कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१९६/२०२६ दि. २७/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयाचे हददीतील बेलापुर–ठाणे वाहीनीवरुन कळवा, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या हददीत सहाचाकी मध्यम, जड, अवजड वाहनांमुळे वर्दळीच्या वेळेमध्ये तसेच गर्दीमुळे अनेक ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/ इ१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब)अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) बेलापुर, नवी मुंबई मार्गे कळव्याच्या दिशेने येणा–या मध्यम, जड व अवजड (सहाचाकी व त्यावरील) वाहनांना **विटावा जकात नाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने पटणी – ऐरोली मार्गे डावीकडे वळुन मुलुंड मार्गे ठाणे – नाशिक वाहीनीवरुन घोडबंदर अथवा नाशिक कडे जातील.

प्रवेश बंद – २) माजिवडा – साकेत – महालक्ष्मी मंदिर – राबोडी मार्गे कळवा नाक्यकडुन नवी मुंबई कडे जाणाऱ्या मध्यम, जड व अवजड (सहाचाकी व त्यावरील) वाहनांना **महालक्ष्मी मंदिर (राबोडी वाहतूक उप विभागाच्या हददीत)** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने खारेगाव टोलनाका येथुन डावीकडे वळुन गॅमन जंक्शन – पारसिक – मुंब्रा – कल्याण फाटा शिळ डायघर मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) पारसिक सर्कल मार्गे कळव्याच्या दिशेने नवी मुंबई, ठाणे शहरामध्ये येणाऱ्या मध्यम, जड व अवजड (सहाचाकी व त्यावरील) वाहनांना **पारसिक सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने पारसिक – मुंब्रा – कल्याण फाटा शिळ डायघर मार्गे अथवा खारेगाव टोलनाका मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – ४) कळवा नाका मार्गे पारसिक सर्कल कडुन नाशिक अथवा पुढे जाणाऱ्या मध्यम, जड व अवजड (सहाचाकी व त्यावरील) वाहनांना **कळवा नाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने पटणी – ऐरोली मार्गे डावीकडे वळुन मुलुंड मार्गे ठाणे – नाशिक वाहीनीवरुन घोडबंदर अथवा नाशिक कडे जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना प्रसिध्द झाले तारखेपासुन (हलकी वाहने व प्रवासी वाहने सोडुन) सहाचाकी मध्यम, जड व अवजड वाहनांना सकाळी ०७:०० वा. ते रात्रौ २२:०० वाजे पावेतो अंमलात राहील. (सहाचाकी मध्यम, जड अवजड वाहनांना नमुद प्रवेशबंदीच्या ठिकाणी नमुदवेळेकरीता प्रतिबंध करण्यात येत आहे.)

सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व / पश्चित प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे / भिवंडी–निजामपुर शहर / कल्याण–डोंबिवली / उल्हासनगर महानगरपालिका.

मुख्याधिकारी कुळगाव बदलापूर / अंबरनाथ नगर परिषद

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे / कल्याण

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ ते ५ व विशेष शाखा,ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, मुंबई

मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई

मा. पोलीस आयुक्त, मिरा–भाईदर, वसई–विरार

मा. अपर पोलीस महासंचालक, वाहतुक विभाग, म.रा.,मुंबई

पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण / पालघर / महामार्ग सुरक्षा पथक

मुख्यव्यवस्थापक वाहतुक जे.एन.पी.टी. न्हावाशेवा

प्रत :– सर्व सपोआ व वाहतुक प्रभारी अधिकारी वाहतूक उपविभाग, ठाणे

प्रत : जड अवजड मालवाहतुक चालक मालक संघटना